# प्रेसनोट

दि. १३/०३/२०२५

अॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून जिल्हा परिषद, पुणे येथील बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंत्यासह उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ अन्वये |
| तक्रारदार | पुरुष, वय ३७ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. बाबुराव कृष्णा पवार, वय ५७ वर्ष, पद – कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (दक्षिण) जिल्हा परिषद, पुणे. (वर्ग-१)<br>२) श्री. दत्तात्रेय भगवानराव पठारे, वय ५५ वर्ष, पद - उपअभियंता, बांधकाम विगाग, जिल्हा परिषद, पुणे (उपविभाग दौंड शिरुर) (वर्ग-१)<br>३) श्रीमती. अंजली प्रमोद बगाडे, कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद (उपविभाग दौंड) (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | लोकसेवक क्र. १ यांनी तक्रारदाराच्या कामाच्या बिलाचे २ टक्के प्रमाणे ८०,००० रुपये<br>लोकसेवक क्र. २ यांनी तक्रारदाराच्या कामाच्या बिलाचे २ टक्के प्रमाणे ८०,००० रुपये<br>लोकसेवक क्र. ३ यांनी एस. क्यु. एम. या कमिटीस देण्यासाठी तक्रारदाराच्या प्रत्येक कामाचे बिलापोटी ७,००० प्रमाणे दोन कामाचे १४,००० रुपये, तसेच तक्रारदाराच्या कामाच्या बिलाच्या २ टक्के प्रमाणे ८०,००० रुपये असे एकुण लाच मागणी २,५४,००० (दोन लाख चौपन्न हजार) रुपये. |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | लोकसेवक क्र. १ यांनी ६४,००० रुपये,<br>लोकसेवक क्र. २ यांनी ६४,००० रुपये,<br>लोकसेवक क्र. ३ यांनी प्रत्येक कामाचे ७,००० प्रमाणे दोन कामाचे १४,००० रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | लोकसेवक क्र. १ यांनी ६४,००० रुपये.<br>लोकसेवक क्र. २ यांनी ६४,००० रुपये व लोकसेवक क्र. ३ यांचेकरीता १४,००० रुपये असे एकुण १,४२,००० (एक लाख बेचाळीस हजार) रुपये. |
| पडताळणी दिनांक | ११/०३/२०२५ |
| सापळा दिनांक | १३/०३/२०२५ रोजी |
| ठिकाण | जिल्हा परिषद कार्यालय, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. रुपेश जाधव, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९८६७५११६९४) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे शासकिय ठेकेदार असून, त्यांच्या फर्मच्या नावाने शासकीय टेंडर घेत असतात. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (दक्षिण) जिल्हा परिषद, पुणे यांनी दौंड तालुक्यातील खुटबाव रोड ते गलांडवाडी पांदन शिव रस्ता व गलांडवाडी मंदिर ते ज्ञानदेव कदम घर रस्ता या कामाचे टेंडर सप्टेंबर २०२४ मध्ये प्रसिद्ध केले होते. तक्रारदार यांना या दोन कामाची वर्कऑर्डर मिळाली होती. नमुद कामाच्या रक्कमेमध्ये जीएसटी व इतर कर अशी दोन्ही कामाची बिल रक्कम ४० लाख रुपये होत आहे.

तक्रारदार यांनी वरील काम केल्यानंतर दि. ३ मार्च २०२५ रोजी यातील लोकसेवक क्र. ३ अंजली बगाडे यांनी तक्रारदाराने केलेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन पुणे जिल्हा परिषदे कडील एस क्यु एम कमिटी केलेल्या कामाची पाहणी करुन अहवाल देईल. त्यासाठी त्या कमिटीकरीता प्रत्येक कामापोटी ७,००० रुपये असे तक्रारदाराच्या दोन कामाकरीता १४,००० रुपयाची लाच मागणी केली. तसेच तक्रारदाराच्या दोन कामाच्या बिलाची फाईल तयार करुन मंजूरीसाठी ऑनलाईन सादर करण्यासाठी कामाच्या बिलाच्या रक्कमेच्या २ टक्के प्रमाणे ८०,००० रुपयाच्या लाचेची मागणी केली.

त्यानंतर तक्रारदार हे यातील लोकसेवक क्र. २ दत्तात्रेय पठारे यांना भेटले असता, त्यांनी तक्रारदाराकडे दोन कामाच्या बिलाची फाईल तपासुन ती फाईल वरिष्ठ अधिकारी यातील लोकसेवक क्र. १ यांचेकडे पाठवण्यासाठी कामाच्या बिलाच्या रक्कमेच्या २ टक्के प्रमाणे म्हणजे ८०,००० रुपयाच्या लाचेची मागणी केली.

त्यानंतर तक्रारदार हे यातील लोकसेवक क्र. १ बाबुराव पवार यांना भेटले असता, त्यांनीसुद्धा तक्रारदाराकडे दोन कामाच्या बिलाची फाईल मंजूर करण्याकरीता व बिल देण्याकरीता कामाच्या बिलाच्या रक्कमेच्या २ टक्के प्रमाणे म्हणजे ८०,००० रुपये लाच मागणी केली अशी तक्रार तक्रारदार यांनी दि. १०/०३/२०२५ रोजी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

Scanned with CamScanner

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ११/०३/२०२५ रोजी यातील लोकसेवक क्र. १, २ व ३ यांचेकडे पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, लोकसेवक क्र. ३ श्रीमती अंजली बगाडे यांनी तक्रारदाराकडे त्यांच्या कामाच्या ठिकाणी जाऊन तपासणी करुन अहवाल देणा-या एस क्यूं एम टीमसाठी तक्रारदाराच्या प्रत्येक कामाचे ७,००० प्रमाणे दोन कामाचे १४,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तसेच लोकसेवक क्र. २ दत्तात्रेय पठारे यांनी तक्रारदाराकडे दोन कामाच्या बिलाची फाईल तपासणी करुन वरिष्ठांकडे मंजुरीसाठी पाठवण्यासाठी तडजोडीअंती ६४,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

लोकसेवक क्र. १ बाबुराव पवार यांनी तक्रारदाराकडे दोन कामाच्या बिलाची फाईल मंजुर करुन बिल काढण्यासाठी तडजोडीअंती ६४,००० रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि. १३/०३/२०२५ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. १ बाबुराव पवार यांनी तक्रारदाराकडून त्यांच्या कामाच्या बिलाची फाईल मंजुर करुन बिल काढण्यासाठी ६४,००० रुपये पंचासमक्ष स्किारले असून, लोकसेवक क्र. २ दत्तात्रेय पठारे यांनी तक्रारदाराकडून स्वतः मागणी केलेले ६४,००० रुपये व लोकसेवक क्र. ३ अंजली बगाडे यांनी मागणी केलेले १४,००० रुपये असे ७८,००० रुपये तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारले असता त्या दोघांना रगेहाथ ताब्यात घेण्यात आले आहे.

तसेच आरोपी क्र. ३ अंतली बगाडे यांनी तक्रारदाराकडे १४,००० रुपये लाच मागणी करुन, ती रक्कम लोकसेवक क्र. २ यांचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना देखील ताब्यात घेण्यात आले आहे.

वरील लोकसेवक क्र. १, २ व ३ यांचेविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

यातील लोकसेवक क्र. १ बाबुराव पवार यांचे शासकीय दालनामध्ये एका बॅगेत ८,५८,४००/- रुपये अशी रोख रक्कम मिळून आली असून, सदर रक्कम तपासकामी ताब्यात घेण्यात आली असून, त्याबाबत चौकशी सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

13.3.25
(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक * ॲन्टी करप्शन ब्युरो * सत्यमेव जयते

Scanned with CamScanner